# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ रिसर्च पार्क फाउंडेशन

## उद्योजकतेची आश्वासक परिसंस्था



**डॉ. अरविंद शाळीग्राम**
मुख्य कार्यकारी अधिकारी
सा. फु. पु. वि. रिसर्च पार्क फाउंडेशन

कोणत्याही देशाच्या किंवा राज्याच्या आर्थिक विकासासाठी उद्योजकता अतिशय महत्वाची आहे. सद्यस्थितीत आपल्या देशातील वातावरण नवउद्योजकतेला प्रोत्साहित करणारे आहे. भारत सरकारच्या विविध उपक्रमामुळे, जसे की मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया, स्कील इंडिया इत्यादि, भारत व्यवस्थापकीय अर्थव्यवस्थेकडून उद्योजकतेवर आधारित अर्थव्यवस्थेकडे वेगाने वाटचाल करु लागला आहे.

पुर्वापार ज्ञानाधारित समाजव्यवस्था व आधुनिक काळातील विद्यापीठांमध्ये सुरु असलेल्या संशोधनावर आधारित नवनविन उपक्रम यांचा सकारात्मक परिणाम आपल्याला ठळकपणे जाणवू लागला आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासारख्या ७०वर्षाहून अधिक जुन्या प्रगतीशील विद्यापीठाने उद्योजकतेला प्रोत्साहित करण्यासाठी ठोस पावले उचलायला सुरुवात केली. विद्यापीठातील विविध विभागांमध्ये गेल्या अनेक वर्षापासुन संशोधन परंपरेमुळे तज्ञ शिक्षक व उत्साही विद्यार्थ्यांचा एक समन्वय दिसुन येत असे. विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरु डॉ. नितीन करमळकर, इतर पदाधिकारी व अधिकारमंडळांनी एक प्रगतीशील निर्णय घेऊन उद्योजकतेसाठी एक तरल परिसंस्था निर्माण करण्यासाठी पाऊल टाकले व २०१९ च्या जानेवारी महिन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ रिसर्च पार्क फाउंडेशन (SPPU Research Park Foundation) हया ना—नफा—ना —तोटा आधारावर, कंपनी कायद्यातील सेक्टर ८ अंतर्गत कार्य करणाऱ्या एका महत्वकांक्षी कंपनीची स्थापना झाली. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ३ फेब्रुवारी २०१९ रोजी या कंपनीचे अभासी पध्दतीने उद्घाटन केले. त्यानंतरच्या सुमारे २ वर्षाच्या कालावधीत हया कंपनीने नव उद्योजकांसाठी एक आश्वासक परिसंस्था निर्माण करण्यासाठी विविध पातळयांवर कार्य केले आहे.

आजमितीला या कंपनीच्या माध्यमातून २५ ते ३० नवउद्योजक उद्योजकतेच्या विविध पातळयांवर कार्य करतांना दिसतात.

आकृती १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे हे रिसर्च पार्क विद्यापीठ, गुंतवणुकदार आणि प्रस्थापित उद्योग यांना जोडणारा महत्वाचा दुवा म्हणून काम करत आहे.




आजच्या उद्योजकतेला प्रोत्साहन देणाऱ्या या आश्वासक परिसंस्थेच्या उपक्रमामध्ये नवउद्योजकांबरोबर सरकार, विद्यापीठातील विव्दान शिक्षक व संशोधक, खाजगी उद्योगसंस्था व गुंतवणुकदार या सर्वांचा मोलाचा वाटा आहे. सुदैवाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ देशातील अग्रगण्य विद्यापीठांपैकी एक असल्यामुळे विविध शासकीय योजनांमधुन उपलब्ध होणारा निधी उद्योजकांपर्यंत पोचण्यास व त्याव्दारे प्रगतिपथावर भरधाव वाटचाल करण्यात सुलभता आलेली आहे.

सर्वसाधारणपणे आपल्या देशातील युवावर्गामध्ये उद्योजकतेची उर्मी अजून तेवढया प्रमाणात निर्माण झालेली दिसून येत नाही. बहुसंख्य उच्चशिक्षीत तरुण अजूनही उत्तम पगाराच्या नोकरीच्या शोधात असतात. या नोकऱ्या शासकीय कार्यालयात किंवा खाजगी संस्थेमध्ये असे साधारण वर्गिकरण असते. त्यामळे सहाजिकच

शिक्षण व्यवस्थेतूनही या नोकऱ्यांसाठी पूर्वतयारी करवून घेणाऱ्या अभ्यासक्रम व इतर उपक्रमांची रेलचेल असते.

प्रगत देशांमधे बदललेले चित्र दिसुन येत आहे. नोकरीच्या संधी हळूहळू कमी होताहेत आणि उद्योजकतेचे फायदे दिसु लागल्यामुळे उद्योजकतेकडे तरुणांचा कल वाढु लागला आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ मधे शिक्षणव्यवस्थेकडे बघण्याच्या मानसिकतेत एक महत्वाचा बदल दिसुन येतो आणि उद्योजकतेला शिक्षण, प्रशिक्षण व उपक्रमांच्या सहाय्याने प्रोत्साहन देण्याची इच्छाशक्ती दिसुन येते. याच इच्छाशक्तीचे एक मूर्त स्वरुप म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ रिसर्च पार्क फाउंडेशन हया कंपनीकडे बघावे लागेल.

स्थापनेपासून कंपनीचे मुख्यत: खालील क्षेत्रामध्ये (अर्थातच एवढयाच क्षेत्रापर्यंत मर्यादित न राहाता) उद्योजकांना प्रोत्साहीत करण्याचे उद्दिष्ट आहे.

१) वाहन उद्योग व स्वयंचलीत उपकरणे

२) आरोग्य सेवेविषयक तंत्र, सेवा व उपकरणे

३) पाण्यासंबंधीत उद्योग व विविध प्रकारच्या कचरा प्रक्रिया व व्यवस्थापन उद्योग

४) शेती

५) नवनविन मटेरियल्सची निर्मिती व वापर

अर्थात या क्षेत्रांतील उद्योगांनी आधुनिक कृत्रिम बुध्दिमत्ता, मशिन लर्निंग, डेटा ॲनलेटिक्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज (IOT), Cloud कम्प्युटिंग वैगरे तंत्रज्ञानाचा वापर प्राधान्याने करावा असा आग्रह आहे.

मुळात विद्यापीठाच्या विविध विभागांमध्ये सुरु असलेल्या संशोधनामुळे आणि देशातील निरनिराळया प्रायोजक संस्थांच्या सहकार्याने /सहाय्याने विविध आधुनिक प्रगत उपकरणे व ती वापरण्याची तज्ञता उपलब्ध आहे. आणि हा एक महत्वाचा घटक नवउद्यमीना घडवण्यासाठी सज्ज आहे. विद्यापीठामधुन दर वर्षी साधारण २.५ ते ३ लाख विद्यार्थी पदवी/पदव्युत्तर परिक्षेला बसतात त्यातील चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण समाधानकारक आहे. यातील अनेक विद्यार्थ्यांना उद्योजकतेची ओळखही नसते.

तसेच अनेक गैरसमज/भिती त्यांच्या मनामधे असतात. आपल्याकडे कुठलाही उद्योगव्यवसाय प्राधान्याने साधारणत: कौटुंबीक व्यवसायाचा वारसा असणारे तरुण स्वीकारतांना व तोच व्यवसाय वाढविण्यासाठी प्रयत्न करतांना दिसतात.

इतरही तरुणाई या क्षेत्राकडे आकर्षित होण्यासाठी विविध उपक्रम व अभ्यासक्रमांचे आयोजन विद्यापीठातल्या Design Innovation Centre (DIC) व Centre for Innovation, Incubation and Enterprises (CIIE) या केंद्रांमार्फत वेळोवेळी करण्यात येते. यांच्याबरोबर SPPU Research Park Foundation चा चांगला समन्वय आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ रिसर्च पार्क फाउंडेशनमधे पुढीलप्रमाणे सुविधा उपलब्ध आहेत —

१) **इनक्युबेशन हॉल** — नविन उद्योजकांना ऑफीस साठी जागा.









२) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ रिसर्च पार्क फाउंडेशनध्ये C4i4 व NAFARI या कंपन्यांसाठी कोलोकेशन सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे.






**३) मार्गदर्शक आणि सल्लागार**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ रिसर्च पार्क फाउंडेशनमधील सर्व स्टार्ट अप / इनक्युबेट्सला रिसर्च पार्क फाउंडेशन तर्फे मार्गदर्शक प्रदान केले जातील. कायदा, विपणन, विक्री, मानव संसाधन इत्यादी तांत्रिक कौशल्यांव्यतिरिक्त विविध विषयांमधून सल्लागार निवडून, स्टार्ट अप चालवताना मार्गदर्शन करण्यासाठी अनुभवी मार्गदर्शकांची नेमणूक केली जाईल. ते उद्योजकांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक मार्गदर्शन करतील.

**४) सुविधा**

कंपनी स्थापित करणे, उद्योजक कर्ज, एसपीपीयू मधील संसाधनाचा उपयोग, आय पी आर संरक्षण, गुंतवणुकदारांपर्यंत पोहोच प्रकल्प व इतर बाहय सुविधा इनक्युबेट्सला उपलब्ध करुन दिल्या जातील.

बीज भांडवल (Seed Funding) — नविन उद्योजकांना रुसा (RUSA –Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan) अंतर्गत निधी उपलब्ध करुन दिला जातो.

**५) उपयोजित संशोधन**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ रिसर्च पार्क फाउंडेशनच्या सहकार्याने उद्योग गरजेच्या आधारित संशोधन कार्य केले जाईल. विद्यापीठामधील आवश्यक ज्ञान व कौशल्य असलेल्या विद्यार्थ्यांना उद्योगांची ओळख करुन देली जाते. व विद्यापीठातील तज्ञ प्राध्यापक, आधुनिक प्रयोगशाळा व उपकरणे व तरुण संशोधकांचे सहाय्य या उक्रमाला होते.






**६) आभासी इनक्युबेशन**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ रिसर्च पार्क फाउंडेशनमध्ये नसलेल्या निवडक कंपन्यांसाठी व्हर्च्युअल इनक्युबेशन सुविधा पुरविली गेली आहे. यामध्ये उद्योजकांना त्यांना सोईस्कर असलेल्या विद्यापीठ बाहय जागेमधून कंपनीचे कामकाज चालवता येते. इनक्युबेशनचे इतर लाभ त्यांना घेता येतात.

**७) प्रकल्प काम**

उद्योजकांना त्यांच्या व्यवसायातील विशिष्ट समस्या सोडविण्याकरीता जर औद्योगीक व शैक्षणिक तज्ञांचे मार्गदर्शन हवे असल्यास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ रिसर्च पार्क फाउंडेशन त्यांच्यासाठी तज्ञ मार्गदर्शकांची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे काम करते. या कामी एसपीपीयु किंवा त्यांच्याशी संबंशित महाविद्यालयामधील योग्य तज्ञांचा समावेश करुन त्यांचा प्रोजेक्ट तयार केला जातो. प्रोजेक्ट टीम मध्ये उद्योग जगतात नावाजलेले व्यक्ती, एसपीपीयुतील प्राध्यापक, काही विद्यार्थी आणि एसपीपीयु आर पी एफचे प्रकल्प समन्वयक असतात.

**संभाव्य उद्योजकांसाठी रिसर्च पार्क फाउडेशनमधे पुढीलप्रमाणे सुसंधी असतील**

- कॅपिटल भांडवल गुंतवणुकीच्या माध्यमातून स्टार्टअपला आर्थिक मदत
- स्टार्टअप्सला तज्ञ मार्गदर्शकांकडुन सल्ला
- स्टार्टअप्सला भांडवलाची मदत
- कामासाठी/संशाधनासाठी सेंट्रल उपकरण सुविधा
- दिलेल्या क्षेत्रात संशोधन करण्यासाठी प्रायोजित संशोधन उपक्रम
- युवा उद्योजकांसाठी प्रशिक्षण आणि कार्यशाळा.

आजच्या प्रगतीच्या काळात उद्योजकतेला प्रोत्साहन देवुन तरुणांमधील धाडसी गुणांना वाव देण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ रिसर्च पार्क फाउंडेशन (SPPU RPF) ही एक आश्वासक परिसंस्था म्हणून पुढे येत आहे.